M/s King Size Properties Pvt Ltd.	Office Unit No.801, 8th Floor, Vaidehi Param House, Survey No 356 Hissa No 1 & 2, CTS No. 4093 & 4092, Village Kole Kalyan, Santa Cruz (E), Mumbai having carpet area of 2070 sq. ft. **Physical Possession date : 28-02-2017**	**Reserve Price (Rs) 3,97,00,000/- Earnest Money Deposit (EMD) 10% of reserve Price i.e. Rs. 39,70,000/- Bid Increment Amount Rs. 25,000/-**

Note : A Securitisation Application (S.A. No. 340/2016) has been filed by the borrower/guarantor before the Hon'ble DRT, Jabalpur which is pending for adjudication. Therefore, the auction is subject to the decision of the aforesaid Securitisation Application.

Date & Time of e-Auction Date : 19-11-2020 from 11.00 a.m. to 2.00 p.m. with unlimited extension of 5 minutes each
Date and time for submission of request letter of participation / KYC Documents/ Proof of EMD etc.: On or before 17.11.2020 upto 5.00 p.m.

For detailed terms and conditions of the sale, please refer to the link provided in State Bank of India, the secured Creditor website https://www.sbi.co.in & IBAPI Portal **https://www.ibapi.in**

STATUTORY NOTICE UNDER PROVISO TO RULE 9 (1)

This publication is also notice to Borrower/Guarantors/Mortgagors as required under Proviso of Rule 9(1)of Security Interest (Enforcement) Rules, 2002.

Date : 02-11-2020 Place : Bhopal
Authorised Officer

निवडक

काश्मीरमध्ये तिरंगा फडकवता येत नसेल तर काय उपयोग?

राऊतांचा थेट मोदी सरकारला सवाल

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) : 'काश्मीर हा फक्त आपल्यासाठी एक जमिनीचा तुकडा नाही, त्याहीपेक्षा बरेच काही आहे. आता तिकडे जमिनी वगैरे खरेदी करण्याची परवानगी सरकारने दिली आहे. पण चार दिवसांपूर्वीच श्रीनगरच्या लाल चौकात तिरंगा फडकवण्यास गेलेल्या तरुणांना पोलिसांनी रोखले. जमिनी खरेदी करायच्या, पण त्या जमिनीवर आमचा तिरंगा फडकवता येत नसेल तर त्या जमिनीच्या तुकड्यांचा उपयोग काय?' असा रोखठोक सवाल शिवसेनेचे खासदार संजय राऊत मोदी सरकारला विचारला आहे.

शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी आपल्या रोखठोक सदरातून ३७० कलम आणि काश्मीरमधील वातावरणावर भाष्य करत मोदी सरकारवर निशाणा साधला आहे.

'३५ अ' कलम संपवले. लडाखला जम्मू-काश्मीरपासून तोडून स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश केला. या घटनेस एक वर्ष झाल्यावर आता जम्मू-काश्मीरमध्ये बाहेरच्या लोकांना जमीन खरेदीस केंद्राने परवानगी दिली आहे. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. काश्मीरमध्ये ३७० कलम असल्यामुळे ते एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगत होते. पुन्हा तेथील राजकीय पक्षांचा दोन दगडांवर पाय. त्यातला एक पाय पाकिस्तानात. हिंदुस्थानच्या केंद्रीय सरकारने मनासारखे केले नाही तर पाकिस्तानप्रेमाचे तुणतुणे वाजवून 'ब्लॅकमेल' करायचे हे आतापर्यंत चालले.

ते काही प्रमाणात कमी झाले आहे. मात्र ३७० कलम हटवल्यावर काश्मीरातील परिस्थिती सुरळीत होईल असे काही झाले नाही. उलट तेथील लोकांवर, राजकीय हालचालींवर कडक निर्बंध लादले. आजही कश्मीरात लष्कराच्या बंदुकांमुळेच शांतता आहे, असं परखड मत राऊत यांनी व्यक्त केले.

'काश्मीरचा प्रश्न फक्त पंडित नेहरू किंवा काँग्रेसमुळेच चिघळला हा काही प्रमाणात अपप्रचार आहे. पंडित नेहरूंनी काश्मीर प्रश्न सोडवण्यासाठी व शांतता राखण्यासाठी त्यांच्या परीने प्रयोग केले. असे 'प्रयोग' अटलबिहारी वाजपेयी यांनीही केले. लाहोरला ते बस घेऊन गेले. मुशर्रफबरोबर आग्रा येथे परिषद घेतली. हा प्रयोगच होता. मोदी-शहा यांनी मेहबुबा मुफ्तींबरोबर भाजपचे सरकार जम्मू-काश्मीरमध्ये बनवले. ते कशासाठी? याकडेही एक शांतता राखण्याचा 'प्रयोग' म्हणूनच पाहायला हवे. मेहबुबा मुफ्ती व त्यांचा पक्ष सरळ आझाद काश्मीरच्या बाजूने आहे. जोपर्यंत पुन्हा ३७० कलम काश्मीरात लावले जात नाही तोपर्यंत काश्मीरात तिरंगा फडकवू दिला जाणार नाही,

अशी बेताल भाषा करणाऱ्या मेहबुबा मुफ्तीला अटक करून दिल्लीतील तिहार किंवा महाराष्ट्रातील येरवडा तुरुंगात ठेवायला हवे. किंबहुना त्यांची रवानगी अंदमानच्या कारागृहात करायला हवी एवढा त्यांचा अपराध भयंकर आहे. डॉ. फारुख अब्दुल्ला यांनी तर हिंदुस्थानच्या विरोधात चीनची मदत घ्यायची भाषा केली. हा अतिरेक आहे' असंही राऊत म्हणाले.

'काश्मीर खोऱ्यातून ४०,००० काश्मिरी पंडितांनी पलायन केले. त्यांची 'घरवापसी' करू व ३७० कलम हटवल्यावर पंडितांना त्यांच्या घरी सहज जाता येईल असा 'प्रपोगंडा' केला गेला. तो चुकीचा आहे. एकही कश्मिरी पंडित अद्याप कश्मीर खोऱ्यात परतू शकला नाही. 'जहाँ हुए बलिदान मुखर्जी वो कश्मीर हमारा है.' ही घोषणा प्रेरणादायी आहे. पाकिस्तानप्रेमींना काश्मीरातून उखडून फेकले पाहिजे. पण पाकिस्तानचा विषय हा देशातील निवडणुकांत तोंडी लावण्याचा विषय आहे. कश्मीर हा फक्त आपल्यासाठी एक जमिनीचा तुकडा नाही, त्याहीपेक्षा बरेच काही आहे' असं मतही राऊत यांनी व्यक्त केले.

आजपासून ओटीपी प्रणालीद्वारे गॅस सिलिंडरची डिलिव्हरी तर सार्वजनिक बँकेच्या वेळा, व्याजदर बदलणार

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) : सर्वसामान्यांच्या जीवनाशी निगडीत गॅस सिलेंडरसह इतर नियमांमध्ये बदल होत आहे. या मुळे सर्वसामान्यांच्या खिशाला झळ बसणार आहे. सिलेंडरच्या घरपोच डिलिव्हरीसाठीच्या नियमांमध्ये आजपासून बदल होत आहे. सिलेंडरच्या घरपोच सेवेसाठी ओटीपी गरजेचा असणार आहे. तसेच राज्यातील राष्ट्रीयकृत बँकांच्या वेळेमध्ये बदल होणार आहे

सिलेंडर ऑनलाईन बुक करतानाच ग्राहकांना पैसे भरावे लागणार आहेत. त्यानंतर ग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाईलवर ओटीपी येईल. गॅस एजन्सीचा कर्मचारी सिलेंडरची डिलिव्हरी करण्यासाठी घरी आल्यावर ग्राहकांना हा ओटीपी दाखवावा लागणार आहे. ओटीपी नसल्यास ग्राहकांना सिलेंडर नाकारलं जाणार आहे.

तसेच आजपासून राज्यातील राष्ट्रीयकृत बँकांच्या वेळेमध्ये बदल होणार आहे. आता बँका सकाळी ९ ते संध्याकाळी ४ या वेळेत सुरू राहतील. सार्वजनिक क्षेत्रातल्या सर्व बँकाना हा नियम लागू असेल. याबाबत काही दिवसांपूर्वी अर्थ मंत्रालयानं सूचना दिल्या होत्या. तर दुसरीकडे स्टेट बँक ऑफ इंडियानं बचत खात्यांवरील व्याजदरात कपात केली आहे. ०.२५ टक्क्यांच्या कपातीनंतर आता व्याजदर ३.२५ टक्के असणार आहे.

बँक ऑफ बडोदा आता पैसे काढण्यासाठी आणि भरण्यासाठी देखील शुल्क आकारणार आहे. ठाराविक मर्यादेपेक्षा जास्त रक्कम काढल्यास ग्राहकांना शुल्क भरावं लागणार आहे. लोन खात्यासाठी तीनपेक्षा जास्त वेळा रक्कम काढल्यास १५० रुपये शुल्क भरावं लागणार आहे. तर बचत खात्यामध्ये ग्राहकांना केवळ तीन वेळाच पैसे जमा करता येणार आहे.

चौथ्यांदा पैसे जमा करायचे असल्यास ग्राहकांना ४० रुपये मोजावे लागणार आहे. इंडेनने आता बुकिंगसाठी एकच नंबर जारी केला आहे. इंडेन ग्राहकांना आता ७७१८९५५५५५ या क्रमांकावर कॉल किंवा एसएमएस करुन सिलेंडरचे बुकिंग करता येणार आहे. तसेच रेल्वे देखील देशभरातील गाड्यांच्या वेळापत्रकात आजपासून बदल करणार आहे.

पान १ वरून

बलात्कारानंतर स्वाभिमानी स्त्री मरण स्वीकारते

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मला सांगितलं की, या महिलेला समोर करून तुम्ही राजकारण करत आहात,' असं रामचंद्रन म्हणाले. सौर ऊर्जा घोटाळ्यात अडकलेल्या महिलेविषयी रामचंद्रन यांनी हे वक्तव्य केलं आहे. या महिलेनं अलिकडेच काँग्रेस नेत्यानं आपल्यावर बलात्कार केल्याचा आरोप केला होता. या महिलेवर टीका करताना रामचंद्रन यांनी वेश्येसोबत तुलना केली आहे. या विधानावरून रामचंद्रन यांच्यावर टीका सुरू झाली. त्यानंतर त्यांनी भूमिका स्पष्ट केली. 'हे सरकार भ्रष्टाचारानं वेढलं गेलं आहे आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी मार्ग शोधत आहे, हेच मी सांगण्याचा प्रयत्न करत होतो. माझ्या वक्तव्याचा अर्थ एखाद्या व्यक्तीशी जोडला गेला असेल, तर त्याबद्दल मी मनापासून खेद व्यक्त करतो. काही जण माझं वक्तव्य हे महिलाविरोधी टीका केल्याचं दाखवण्याचा प्रयत्न करीत आहेत,' असं रामचंद्रन यांनी म्हटलं आहे.

केंद्र सरकारमुळे रखडली मुंबई लोकल

अनिल देशमुख यांचा आरोप

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) : मुंबईतील सर्वसामान्य लोकांसाठी रेल्वेची उपनगरी लोकल सेवा सुरू करण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने केंद्रीय रेल्वे विभागाला रीतसर पत्र पाठवले आहे. तथापि, रेल्वे विभाग ही सेवा सुरू करण्याच्या कामात खोडा घालत आहे, असा आरोप गृहमंत्री अनिल देशमुख यांनी गुरुवारी केला आहे. सामान्य मुंबईकरांना दिलासा देण्यासाठी लवकर लोकलसेवा सुरू करावी, यात राजकारण करण्याचे काहीच कारण नाही, असा टोला गृहमंत्री देशमुख यांनी लगावला आहे.

मुंबईकरांची जीवनवाहिनी असलेली रेल्वेची लोकल सेवा सर्वसामान्य प्रवाशांना ठराविक वेळा उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून गर्दी टाळता येईल, अशा पद्धतीचे तपशीलवार पत्र केंद्रीय रेल्वे मंत्रालयास देण्यात आले होते. लोकल



सर्वसामान्यांसाठी सुरू झाली, तर त्यांना दिलासा मिळेल. यात रेल्वेने राजकारण करू नये, असे देशमुख यांचे म्हणणे आहे. यापूर्वीही परप्रांतीय मजुरांना त्यांच्या गावी पाठवताना रेल्वे आणि राज्य सरकार यांच्यात वाद झाला होता. आता पुन्हा वादाची ठिणगी पडण्याची शक्यता आहे.

मुंबईकरांना सरसकट लोकल सुरू करण्यासंदर्भात राज्य सरकारने पश्चिम आणि मध्य रेल्वेला पत्र पाठविले होते. या पत्राला रेल्वे प्रशासनाकडून उत्तर आले आहे. लोकल सुरू झाल्यावर गर्दीचे नियोजन कसे करणार, अशी विचारणा पत्राद्वारे रेल्वे विभागाने राज्य सरकारला केली आहे. शिवाय लोकल सुरू करण्यासंदर्भात राज्य सरकार आणि रेल्वे यांची संयुक्त बैठक लवकर व्हावी. यात गर्दीचे नियोजन करण्याच्या संदर्भात व्यवहार्य मार्ग काढावा, असे पत्रात म्हटले आहे.

शासनाने कोविड कालावधीमध्ये केलेल्या दर निश्चितीकरणामुळे सर्वसामान्यांना दिलासा - उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) : कोविड कालावधीमध्ये राज्य शासनाने समाजाच्या हितासाठी व नागरिकांना दिलासा देण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. या निर्णयाचा फायदा अनेक गरीब नागरिकांना झाला.

शासन आपल्या पाठीशी असल्याची भावना सर्वसामान्यांच्या मनात रुजली, असे विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.

जन स्वास्थ्य अभियान, महाराष्ट्र या सामाजिक संस्थेच्या प्रतिनिधींबरोबर वेबिनारद्वारे चर्चा करताना त्या बोलत होत्या. ज्या रुग्णालयांना शासकीय जमीन अथवा शासकीय निधी देण्यात आलेला आहे किंवा वैद्यकीय महाविद्यालय जोडलेले आहे अशा हॉस्पिटलना सामाजिक बांधिलकी म्हणून काही बेड आरक्षित करणे व बिलामध्ये सवलत देणे याबाबत काटेकोर अंमलबजावणीसाठी शासन प्रयत्न करेल, असे डॉ.गोऱ्हे म्हणाल्या. आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेला मुदत वाढ द्यावी याबाबत आवश्यक पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

शासनाचा प्रत्येक विचार हा सामान्य नागरिकांच्या हिताचा आहे.

कोविड कालावधीतील शासनाची कार्यवाही ही राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या चौकटीत व या कायद्यानुसारच आहे, असेही डॉ.नीलम गोऱ्हे यांनी स्पष्ट केले.

सुरुवातीला नीरजा भटनागर यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रा. ब्रिनेल टाटा इन्स्टिट्यूट यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये शासनाने कोविडच्या कालावधीमध्ये विविध वैद्यकीय उपकरणांच्या व वैद्यकीय सेवेवर जे नियंत्रण आणले त्याबाबत शासनाचे अभिनंदन केले.

महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्याही विस्तारीकरणामुळे सर्वसामान्य जनतेला या कालावधीमध्ये उत्पन्नाचे साधन थांबलेले असताना मोठ्या प्रमाणामध्ये दिलासा मिळाला.

डॉ.संजय नागराळ यांनी मुंबई महानगरपालिका व खाजगी हॉस्पिटल यांनी फार चांगली सेवा पुरविली आहे, त्यामुळे ही सेवा यानंतरही सुरू ठेवावी, असे निवेदन या सभेमध्ये केले. श्रीमती नसरीन यांनी महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा अजून विस्तार करावा यावर भर दिला.

राजू दुग्गल, अमर जेसांनी, श्वेता तांबे, नर्सेस असोसिएशनच्या स्वाती राणे, अविनाश कदम यांचीही यावेळी भाषणे झाली.

रेणुका शहाणे, शरद पोंक्षे यांचीही चर्चा

१२ नावे अजूनही गुलदस्त्यात

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) : राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून विधान परिषदेवर कोणाची वर्णी लागणार, याचे उत्तर गुलदस्त्यात असतानाच आज आणखी काही नावे चर्चेत आली आहेत. शिवसेनेकडून अभिनेते शरद पोंक्षे यांचे नाव पुढे आले आहे तर काँग्रेसमधून अभिनेत्री रेणुका शहाणे यांना संधी देण्याची मागणी करण्यात येत आहे. राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून कला, साहित्य, समाजसेवा आणि सहकार या क्षेत्रांशी संबंधित १२ व्यक्तींची महाराष्ट्राच्या विधान परिषदेवर वर्णी लागणार आहे. त्यासाठी शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडून प्रत्येकी ४ नावांची शिफारस करायची आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ही १२ नावे चर्चेअंती निश्चित करण्यात आल्याचे सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात या नावांत आयत्यावेळी बदल करण्याचे धोरण तिन्ही पक्षांनी अवलंबले असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. सोमवारी ही यादी राज्यपालांकडे पाठवली जाण्याची शक्यता आहे. त्याआधी प्रत्येक नावावर सखोलपणे विचार करण्यात येत आहे. राज्यपाल नियुक्त सदस्यासाठी आवश्यक निकषांच्या अनुषंगाने कोणतीही त्रुटी राहू नये याची कटाक्षाने काळजी घेण्यात येत आहे. त्यासाठीच मुख्यमंत्री ठाकरे व सरकारचे मार्गदर्शक शरद पवार यांच्यात शुक्रवारी बैठक झाल्याचे सांगण्यात येत आहे. शिवसेनेकडून अभिनेत्री उर्मिला मातोंडकर हे एक नाव निश्चित असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. त्यानंतर आज सावरकरप्रेमी अभिनेते शरद पोंक्षे यांचे नाव अचानक चर्चेत आले आहे. हिंदुत्वावरून भाजप शिवसेनेवर टीकेचे बाण सोडत असताना व सावरकरांचा उल्लेख वारंवार केला जात असताना पोंक्षे यांना विधान परिषदेवर पाठवून भाजपला शह देण्याची खेळी शिवसेना खेळू शकते, असे जाणकारांचे म्हणणे आहे.

त्यावर पोंक्षे यांनी मात्र सावध प्रतिक्रिया दिली आहे. मला याबाबत अद्याप शिवसेनेकडून कोणतीही विचारणा करण्यात आलेली नाही, असे पोंक्षे यांनी माध्यमांना सांगितले. दुसरीकडे शिवसेना प्रवक्ते संजय राऊत यांनीही त्यास दुजोरा दिला नाही.

कोरोना काळात पडद्यामागील कलाकारांना मदत केल्याबद्दल प्रशांत दामले यांचा राज्यपालांच्या हस्ते सन्मान

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) : कोरोना काळात आर्थिक संकटात सापडलेल्या पडद्यामागील कलाकारांना मदतीचा हात देणारे अभिनेते प्रशांत दामले यांचा आज राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते राजभवन येथे सत्कार करण्यात आला.



निर्माते, दिग्दर्शक सुभाष घई, नगरसेविका अलका केरकर यांसह समाजाच्या विविध क्षेत्रात कोरोना काळात असामान्य कार्य करणाऱ्या कोरोना योद्ध्यांचा यावेळी राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अनादी काळापासून आपल्या देशातील लोकांमध्ये समाजसेवेची आवड आहे. जनसेवा ही ईशसेवा मानली गेली आहे. समाजाला देणे ही संस्कृती लोकांच्या रक्तामध्ये भिनलेली आहे. त्यामुळे कोरोना काळात समाजासाठी काम करण्याची अहिमहीका बघायला मिळाली, असे यावेळी राज्यपालांनी सांगितले.

कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते. समाजातील प्रत्येक घटकाचे कार्य सारखेच महत्त्वाचे असते. कोरोना देशातून लगेचच जाण्याची चिन्हे नाहीत, त्यामुळे यापुढेही कोरोना योद्ध्यांनी आपापल्या क्षेत्रामध्ये सेवाकार्य सुरु ठेवावे, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केली.

विविध इस्पितळांमधील डॉक्टर्स, परिचारिका, वार्ड बॉईज, स्थलांतरित मजुरांना अन्नधान्य देणारे, गरजू व्यक्तींना व संस्थांना मोफत मास्क, सॅनिटायझर्स, पीपीई किटस पुरविणाऱ्या दानशूर व्यक्ती अशा ४५ कोरोना योद्ध्यांच्या सत्कार करण्यात आला.

भाभा हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रदीप जाधव, परिचारिका दिपाली इंदुलकर, सफाई कर्मचारी उदयकुमारी चरमर, जसलोक रुग्णालय येथील परिचारिका सोनल घुमे, आरोग्य सेविका लतिका नकते, फादर कॉसमॉस एक्का, होली स्पिरीट इस्पितळाच्या कार्यकारी संचालिका स्नेहा जोसेफ, ट्राफिक वार्डन अनिता लोबो, वैद्यकीय अधिकारी संजय फुंदे, वार्ड अधिकारी सुरेंद्र सिंग, संदीप मुर्जानी व देवयानी वैद्य, जैन संघटनेचे संजय दोषी, रेडीओलॉजिस्ट डॉ.पूजा राजेश छेडा, किशोर मन्याल, महावीर हॉस्पिटलचे प्रकाश कोठारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

पॉवर ग्रिडच्या संचालकपदी अभय चौधरी यांची नियुक्ती

नवी दिल्ली, दि. १ (वृत्तसंस्था) : सार्वजनिक क्षेत्रातील अग्रेसर कंपनी पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (पीजीसीआयएल) अभय चौधरी यांची संचालक (प्रकल्प) म्हणून नियुक्ती केली आहे. पीजीसीआयएलने रविवारी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या जबाबदारीपूर्वी चौधरी वाणिज्य व नियामक कक्षाचे कार्यकारी संचालक होते. त्यांच्याकडे समन्वय कक्षाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचीही जबाबदारी होती. अभय चौधरी यांनी नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एनआयटी) दुर्गापूर येथून इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंगची पदवी संपादन केली. तसेच आयएमटी गाझियाबाद येथून मॅनेजमेंट डिप्लोमा इन केला आहे. विद्युत क्षेत्रातील ३५ वर्षाहून अधिकच्या कार्यकाळात चौधरी यांनी ईएचवी सब-स्टेशन आणि ट्रान्समिशन लाईनमधील विविध प्रकारचे ऑपरेशन व मेन्टनन्ससह बांधकाम अभियंतापदावरही काम केलेले आहे. चौधरी यांना अतिदुर्गम आणि नक्षलवादी प्रभावित क्षेत्रातही योग्य प्रकारे काम करण्याचा दांडगा अनुभव आहे. झारखंड आणि ओदिशामधील उच्च क्षमतेच्या पारेषण



कॉरिडॉर निर्मितीसह बिहारमधील आरजीजीवीवाई तथा एपीडीआरपी परियोजना कार्यान्वित करण्यातही त्यांचे योगदान मोलाचे ठरले आहे. केंद्रीय कार्यालयात रुजू होण्यापूर्वी चौधरी यांनी २०१५-१७ दरम्यान पूर्वोत्तर भागात कार्यकारी संचालक पदी काम केले आहे.

जाहीर सूचना

माझे अशील श्री. योगेश मनुभाई देसाई व श्रीम. विमला योगेश देसाई यांच्याकडून तालूका अंधेरी येथील सीटीएस क्र. ५९८ धारक जमिनीच्या प्लॉटवरील ७०-एसव्ही रोड, इरला ब्रिज, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५८ येथील बिल्डींग एसबीआय कार्यालय साई दर्शन को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि. म्हणून ज्ञात फ्लॅट क्र. बी-८०२, ८ वा मजला, बी विंग, मोजमापित अंदाजे ११४.८२ चौ. मीटर बिल्ट अप क्षेत्रफळाची मालमत्ता खरेदी करण्याचा प्रस्ताव करत आहेत.

कोणाही व्यक्तीस सदर मालमत्तेमध्ये कोणतेही हक्क, अधिकार, दावे वा हितसंबंध असल्यास तसेच सदर संबंधात विक्री, अदलाबदल, वारसा, ताबा, जप्ती, गहाण, धारणाधिकार, भाडेकरार, भेट वा अन्य काही असल्यास त्यांनी प्रसिद्धीच्या १५ दिवसांच्या आत (दोन्ही दिवस समाविष्ट) अधोहस्ताक्षरित यांना संबंधित दस्तावेजांसह लेखी स्वरूपातील आक्षेप सूचित करावे अन्यथा सदर व्यक्तींचे दावे अधित्यागीत व/वा परित्यागीत मानले जातील.

ठिकाण : मुंबई
दि. २ नोव्हेंबर, २०२०

वकील एम. भट्ट
९८२०९३६१०३

महेश डेव्हलोपर्स लिमिटेड

(पूर्वीचे महेश डेव्हलोपर्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात)
सीआयएन क्र. U45200MH2008PLC186276
नोंदणीकृत कार्यालय : उमा शिखर, १३ वा रोड, खार टेलेफोन एक्सचेंजजवळ, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२, भारत. ईमेल आयडी : mdplgroup@gmail.com दू. क्र. ०२२-२६०००० ३८
कंपनी वेबसाइट : www.maheshdevelopers.com

सूचना

आम्ही याद्वारे तुम्हाला सूचित करू इच्छितो की, महेश डेव्हलोपर्स लिमिटेड यांची मंडळाची सभा तिमाही अखेर दि. ३० सप्टेंबर, २०२० व अन्य अजेंडा बाबींकरिता अलेखापरीक्षित तिमाही वित्तीय अहवालांवर विचारविनीमय व मंजूरी देण्याकरिता मंगळवार, दि. १० नोव्हेंबर, २०२० रोजी उमा शिखर, १३ वा रोड, खार टेलेफोन एक्सचेंजजवळ, खार (पश्चिम), मुंबई महाराष्ट्र - ४०० ०५२ येथे स. ११.३० वा. आयोजित केली आहे.

मंडळाच्या आदेशान्वये
महेश डेव्हलोपर्स लिमिटेडकरिता
सही/-
महेश सपारिया
संचालक
डीआयएन : ००४१४१०४

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०२.११.२०२०

युरो मल्टीव्हिजन लिमिटेड

सीआयएन : L32300MH2004PLC145995
नोंदणीकृत कार्यालय : एफ/१२, तळ मजला, संगम आर्केड, वल्लभभाई रोड, विले पार्ले (पश्चिम), मुंबई - ४०० ०५६. दूर. क्र. +९१-२२-४०३६ ४०३६ फॅक्स : +९१-२२-४०३६, ४०३७
ईमेल : info@euromultivision.com वेबसाइट : www.euromultivision.com

जाहीर सूचना

सूचना याद्वारे सभासदांना देण्यात येते की, युरो मल्टीव्हिजन लिमिटेड यांच्या सभासदांची १६ वी (सोळावी) वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) बुधवार, २५ नोव्हेंबर, २०२० रोजी स. १०.०० वा. (भाप्रवे) व्हिडीओ कॉन्फरेंसिंग (व्हीसी)/ अन्य ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (ओएव्हीएम) मार्फत १६ व्या एजीएममध्ये सूचनेमध्ये पार पडलेल्या व्यवसायांवर विचार विनीमय करण्याकरिता आयोजित केली आहे.

सीक्युरिटीज अ‍ॅन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) (यापुढे सर्क्युलर्स म्हणून एकत्रितरित्या संदर्भित) यांच्याद्वारे जारी मिनीस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (एमसीए) व सर्क्युलर क्रमांक सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दि. १२ मे, २०२० द्वारे जारी सामान्य सर्क्युलर क्र. २०/२०२० दि. ५ मे, २०२०, १४/२०२० दि. ८ एप्रिल, २०२०, १७/२०२० दि. १३ एप्रिल, २०२० अंतर्गत कंपनीने व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएम आयोजित केली आहे व सदर ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीविना आयोजित केली आहे. सदर सर्क्युलर सहवाचन कंपनी कायदा, २०१३ (अ‍ॅक्ट) व सीक्युरिटीज अ‍ॅन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ (सेबी सूची विनियमन) अंतर्गत व्हीसी/ओएव्हीएम मार्फत कंपनीने एजीएम आयोजित केली आहे.

कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स/ रजिस्ट्रर व शेअर ट्रान्सफर एजन्ट यांच्यासह नोंदणीकृत ज्यांचे ई-मेल आयडी सभासदांसह नोंदणीकृत आहेत त्यांना ईलेक्ट्रॉनिकली दि. ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या वित्तीय वर्ष अखेरकरिता सूचना व वार्षिक अहवाल पाठविला आहे. सूचनेची प्रत कंपनीची वेबसाइट www.euromultivision.com वर उपलब्ध आहे व कंपनीच्या इक्विटी शेअर्स ज्यांचे स्टॉक एक्सचेंजची वेबसाइटवर सूचीत बीएसई लिमिटेड व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.bseindia.com व www.nseindia.com व सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) www.evotingindia.com वर उपलब्ध आहे.

एमसीए व सेबी द्वारे जारी सर्क्युलर सह सभासदांनी त्यांचे ईमेल आयडी खालील निर्देशित स्वरूपात वार्षिक अहवाल/लॉगीन क्रेडेंशिअल यांची ईलेक्ट्रॉनिक प्रत व त्यांचे ईमेल आयडी अद्ययावत करावे व कोणत्याही सभासदांना वार्षिक अहवाल प्रत्यक्ष प्रत पाठविण्यात येणार नाही :

जे सभासद प्रत्यक्ष स्वरूपातील शेअर्स धारक आहेत व ज्यांनी त्यांचे ईमेल आयडी कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स/ रजिस्ट्रर व शेअर ट्रान्सफर एजन्ट (आरटीए) यांच्यासह अद्ययावत केलेले नाहीत त्यांनी कृपया त्यांचे ईमेल आयडी कंपनीच्या ईमेल आयडी वा आरटीए ईमेल आयडी लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना लेखी स्वरूपात rnt.helpdesk@linkintime.co.in वर विनंती पाठवावी. सभासदांना विनंती आहे की, त्यांनी फोलिओ क्र. व सभासदांचे नाव व स्कॅन्ड प्रत शेअर प्रमाणपत्र (पुढील व मागील), पॅन (सेल्फ अटेस्टेड स्कॅन्ड प्रत पॅन कार्ड), आधार (आधार कार्डची सेल्फ अटेस्टेड स्कॅन्ड प्रत) जोडावी.

जे सभासद डिमटेरियलाईज्ड स्वरूपातील शेअर्स धारक आहेत त्यांनी त्यांचे ईमेल आयडी अद्ययावत करावे ही विनंती व कंपनीच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स सह त्यांचे ईमेल आयडी नोंदणीकृत करावे व कंपनीचा ईमेल आयडी वा आरटीए ईमेल आयडी info@euromultivision.com/ rnt.helpdesk@linkintime.co.in वर ईमेल द्वारे डिपॉझिटरी पार्टिसिपंट्ससह त्यांचे ईमेल आयडी नोंदणीकृत करावे ही विनंती.

कंपनी व आरटीए सीडीएसएल यांच्यासह को-ऑर्डिनेट करत आहेत व वरील नमूद भागधारक यांना लॉगीन क्रेडेंशिअल प्रदान करत आहे व सदर सभासदांकडून आवश्यक दस्तावेज व तपशील पावती स्विकृत करत आहेत.

ईलेक्ट्रॉनिक स्वरूपातील मतदान (ई-मतदान) :

कंपनी सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लि. (सीडीएसएल)द्वारे करार करत आहे व प्राधिकृत ई-मतदान एजन्सी कडून परोक्ष ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देत आहे. एजीएमच्या सूचनेत विहित सर्व विषयांकरिताचे परोक्ष ई-मतदान सभासदांना पाठविण्या येईल व सदर सूचना ईलेक्ट्रॉनिक स्वरूपातून त्यांचे मतदान अकार्यत करण्यात येईल. ई-मतदान प्रणाली (ई-मतदान) मार्फत एजीएम दरम्यान त्यांचे मतदान पूर्ण करण्याकरिता व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएमच्या ठिकाणी उपस्थित सभासदांना एजीएम ठराव करण्यात येतील.

प्रत्येक सभासद जो केवळ एका माध्यमातून मतदान करू शकतो अर्थात बॅलोट प्रपत्र वा ई-मतदानाच्या माध्यमातून करता येईल. जर तुम्ही ई-मतदानाच्या माध्यमातून करत असाल तर कृपया बॅलोट प्रपत्राच्या माध्यमातून एजीएममध्ये मतदान करू नका.

जर कोणत्याही स्वरूपातील तक्रार असल्यास ई-मतदान/परोक्ष ई-मतदान संबंधात काही असल्यास त्यांनी श्री. राकेश दळवी, व्यवस्थापक (सीडीएसएल) यांना helpdesk.evoting@cdslindia.com वर वा १८००२२५५३३ वर संपर्क साधावा.

युरो मल्टीव्हिजन लिमिटेडकरिता
सही/-
हितेश शाह
अध्यक्ष व संपूर्ण वेळ संचालक
डीआयएन : ०००४३०५९

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३१ ऑक्टोबर, २०२०

पश्चिम रेल्वेद्वारे मुंबई उपनगरीय अनुभागावर १० महिला विशेष व १२ एसी उपनगरीय सेवांसहित, १००० विशेष उपनगरीय सेवा चालविण्यात येणार.

दि. १ नोव्हेंबर, २०२० पासून



सोशल डिस्टन्सिंगचे पालन करता येण्यासाठी व अतिरिक्त गर्दी टाळण्यासाठी पश्चिम रेल्वेने रविवार, दि. १ नोव्हेंबर, २०२० पासून दैनंदिन विशेष उपनगरीय सेवांची संख्या ७०४ वरून १००० पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व प्रवाशांनी कृपया सोशल डिस्टन्सिंगच्या निकषांचे पालन करावे व लोकल ट्रेनमधून प्रवास करतेवेळेस मास्क परिधान करावा. महाराष्ट्र शासनाद्वारे अधिसूचित केल्यानुसार सर्व महिला (स. ११.०० ते दु. ३.०० व सायं. ७.०० पश्चात), प्रॅक्टिस करणारे वकील तसेच वकिलांचे नोंदणीकृत क्लार्क हे विहित केलेल्या वेळेदरम्यान महाराष्ट्र शासनाद्वारे परवानगी असल्यानुसार सदर विशेष गाड्यांतून प्रवास करू शकतील.

वाढवलेल्या उपनगरीय सेवांची ठळक वैशिष्ट्ये

- **सेवांच्या संख्येमध्ये वाढ - २९६**
- **अतिरिक्त ४ (धीम्या) महिला विशेष गाड्या**
  - १ अप दिशेने बोरिवली - चर्चगेट दरम्यान (०७.४० - ०८.४७)
  - १ अप दिशेने भाइंदर - चर्चगेट दरम्यान (०९.०६ - १०.३०)
  - १ अप दिशेने वसई रोड - चर्चगेट दरम्यान (१०.०४ - ११.३०)
  - १ डाऊन दिशेने चर्चगेट - बोरिवली दरम्यान (१७.३९ - १८.४८)
- **सकाळच्या गर्दीच्या वेळेत सेवांमध्ये वाढ : ७६ (अप + डाऊन)**
- **संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत सेवांमध्ये वाढ : ५१(अप + डाऊन).**

१००० उपनगरीय सेवांची विभागणी

या दरम्यान असलेल्या सेवा	१००० सेवांचा तपशील		
	अप	डाऊन	एकूण
विरार - चर्चगेट	१०३	१०४	२०७
बोरिवली - चर्चगेट	१७८	१६७	३४५
दादर - विरार	१९	१९	३८
वांद्रे - विरार	६	९	१५
अंधेरी - विरार	३७	२८	६५
विरार - बोरिवली	२९	२३	५२
भाइंदर - विरार	०	६	६
वांद्रे - नालासोपारा	४	०	४
नालासोपारा- चर्चगेट	०	३	३
अंधेरी - नालासोपारा	१	५	६
बोरिवली - नालासोपारा	१	२	३
चर्चगेट - भाइंदर	२६	२१	४७
दादर - भाइंदर	२	१	३
वांद्रे - भाइंदर	०	२	२
अंधेरी - भाइंदर	३	८	११
बोरिवली - भाइंदर	०	५	५
वसई रोड - चर्चगेट	१२	९	२१
वांद्रे - वसई रोड	०	१	१
अंधेरी - वसई रोड	५	३	८
वसई रोड - बोरिवली	२	६	८
महालक्ष्मी - बोरिवली	०	६	६
वांद्रे - बोरिवली	०	८	८
चर्चगेट - वांद्रे	३	१३	१६
चर्चगेट - मालाड	५	४	९
चर्चगेट - गोरेगाव	२१	२१	४२
चर्चगेट - अंधेरी	१०	१०	२०
चर्चगेट - मुंबई सेंट्रल	०	५	५
अंधेरी - बोरिवली	०	१	१
दादर - बोरिवली	०	३	३
डहाणू रोड - चर्चगेट	६	७	१३
डहाणू रोड - दादर	२	१	३
डहाणू रोड - अंधेरी	१	१	२
डहाणू रोड - बोरिवली	१	१	२
डहाणू रोड - विरार	९	९	१८
महालक्ष्मी - विरार	०	१	१
लोअर परेल - विरार	०	१	१
एकूण	४८७	५१३	१०००

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
Like us on : facebook.com/WesternRly
Follow us on : twitter.com/WesternRly